## वेचक

### खेड जेसी फेस्टिव्हलला गोळीबार मैदानात ६ फेब्रुवारीपासून प्रारंभ

**खेड (प्रतिनिधी) :** येथील खेड जेसीजचा वैविध्यपर्ण जेसी फेस्टिव्हल शहरातील गोळीबार मैदान येथे ६ ते ११ फेब्रुवारीदरम्यान होणार असल्याची माहिती जेसीजचे कार्यक्रमप्रमुख अमोल क्षीरसागर यांनी दिली. यावेळी खेड जेसीजचे अध्यक्ष संकेत अपिष्टे, सचिव अमर दळवी, फाऊंडर मेंबर डॉ. श्याम गिल्डा, पराग पाटणे, गणेश राऊत, शैलेश मेहता, दीपक नलावडे, प्रथमेश खामकर, प्रमोद कांबळे आदी उपस्थित होते. सन २००४ ला आमच्या जेसी फेस्टिव्हलला सुरुवात झाली असून, या वर्षीचे हे २० वे फेस्टिव्हल आहे. ६ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी चौक ते गोळीबार मैदान अशा कार्निव्हलमध्ये महाराष्ट्रामधील संस्कृतीचे दर्शन खेडवासीयांना घडणार आहे. फेस्टिव्हलमध्ये कन्झ्युमर फूड, आनंदमेळा यांचे आकर्षण असणार आहे. मराठी अभिनेत्री रूपाली भोसले, स्मिता गोंदकर या सेलिब्रिटी येणार आहेत. ११ फेब्रुवारीला परदेशी कलाकारांचे आकर्षण असणार आहे. स्थानिक कलाकारांना व विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्याची संधीही मिळणार आहे. फेस्टिव्हलमध्ये रंग फेस्टिव्हल ही अनोखी स्पर्धा असणार असून, विविध समाजोपयोगी कार्यक्रमही राबवण्यात येणार आहेत. परदेशी आफ्रिकन डान्सर यांच्या कलागुणांचे प्रदर्शन घडवण्यात येणार असल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले.

### आयेशा तिसेकर हिचा दिल्लीत 'वीरगाथा' पुरस्काराने सन्मान

**खेड (प्रतिनिधी) :** सीबीएसई बोर्डामार्फत देशभरात घेण्यात आलेल्या वीरगाथा स्पर्धेत भरणे-बाईतवाडी येथील रोटरी इंग्लिश मीडियम स्कूलमधील इ. ११वी विज्ञान शाखेतील आयेशा तिसेकर हिने रेखाटलेल्या चित्राला देशातील सुपर १०० गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये नामांकन मिळाले. याबद्दल दिल्ली येथे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते तिला वीरगाथा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सी बी.एस.ई. अंतर्गत वीरगाथा स्पर्धा ३.० मध्ये तिने चित्रात एका बाजूला १९८४ मध्ये आदिवासी आपल्या हक्कासाठी संघटित होत आहेत, असे दृश्य रेखाटले होते. संस्था चेअरमन बिपीन पाटणे, मुख्या. भूमिता पटेल यांसह पदाधिकाऱ्यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. तिला कला विभागप्रमुख मानसी देवघरकर, शुभम जड्याळ यांचे मार्गदर्शन लाभले.

### जिल्हा संयोजकपदी डॉ. अजित भोसले

**खेड (प्रतिनिधी) :** भारतीय जनेता पार्टी शिक्षण संस्था चालक उत्तर रत्नागिरी जिल्हा संयोजकपदी डॉ. अजित भोसले यांची निवड करण्यात आली आहे. संयोजक प्रा. डॉ. राजीव वाघ यांनी तसे नियुक्तीपत्र दिले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व भाजपा जिल्हाध्यक्षांच्या शिफारशीने शैक्षणिक क्षेत्रात केलेले उत्तमकार्य व संघटन कौशल्याची दखल घेत त्यांच्याकडे जिल्हा संयोजकपदाची धुरा सोपवण्यात आली.

# 'काजू बी'ला प्रति किलो २०० रुपये हमीभाव द्या!

## प्रमोद जठार यांनी घेतली अर्थमंत्री अजित पवार यांची भेट

◆ **राजापूर (वार्ताहर) :**

कोकणातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना 'काजू बी'ला भावांतर योजनेंतर्गत प्रतिकिलो २०० रु. हमीभाव किंवा अनुदान मिळावे या मागणीसाठी मंगळवारी भाजप नेते प्रमोद जठार यांनी मंत्रालयात अर्थमंत्री अजित पवार व सिंधुदुर्गचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेऊन पत्र दिले. यावेळी अर्थमंत्र्यांनी असा प्रस्ताव कॅबिनेटमध्ये आणल्यास आपण पैसे द्यायला तयार आहे, असे सांगितले. ही बाब प्रमोद जठार यांनी चव्हाण यांच्या कानावर घालताच येत्या ३ फेब्रुवारीला मंत्रालयात बैठक बोलावून हा विषय मार्गी लावूया, असे आश्वासन दिले.

प्रमोद जठार यांनी अर्थमंत्री आणि पालकमंत्री यांना दिलेल्या निवेदनात कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व कोल्हापूर जिल्ह्यातील कोकणशी संबंधित भागात काजूचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. काही गावांतून पूर्वजांनी लागवड केलेल्या काजूचे उत्पादन घेत आजही अनेक कुटुंबे उदरनिर्वाह करत आहेत. तसेच कोकण कृषी विद्यापीठाच्या नवनवीन संशोधनातून काजूच्या नवनवीन जाती निर्माण होत आहेत. त्याच्या लागवडीमुळे काजू उत्पादनात वाढ झाली आहे; परंतु आजपर्यंत काजू बील महाराष्ट्र सरकारने हमीभाव ठरवून दिला नाही. गोवा सरकारने काजू बील १५० रु. किलोचा हमीभाव जाहीर केला आहे. काजू बीच्या दरात दरवर्षीप्रमाणे अस्थिरता असल्याने शेतकरी आर्थिक संकटात आहेत. काजू व्यापारी जो योग्य वाटेल त्या दरात काजू खरेदी करतात. महाराष्ट्र सरकारच्या आदेशानंतर काजू बीच्या दर निश्चितीबद्दल अभ्यास झाला, तेव्हा कोकण कृषी विद्यापीठाने १२९ रु. इतका खर्च काजू उत्पादनासाठी होतो, असा अहवाल सरकारला सादर केला. याचा विचार काजू उत्पादनासाठी २०० रु. प्रतिकिलो हमीभाव द्यावा, असे म्हटले आहे. दरम्यान चव्हाण यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना पत्र लिहून याविषयावर सकारात्मक कार्यवाहीसाठी आपल्या अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी, असे म्हटले आहे.

### अनादी फाऊंडेशनच्या युवा महोत्सवाचे निलेश राणे यांच्या हस्ते उद्घाटन



◆ **रत्नागिरी (प्रतिनिधी) :**

रत्नागिरी तालुक्यातील जाकादेवी येथे अनादी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या युवा महोत्सव २०२४ चा शुभारंभ भारतीय जनता पक्षाचे नेते माजी खासदार निलेश राणे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेश सावंत, ज्येष्ठ नेते दत्ता देसाई, भाजपा युवा मोर्चा रत्नागिरी उत्तर तालुकाध्यक्ष प्रतीक देसाई तसेच भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी निलेश राणे यांनी युवा महोत्सवाला शुभेच्छा देताना नवीन भारत घडवताना युवकांचे योगदान सर्वात महत्त्वाचे असल्याचे सांगितले. तसेच महोत्सव युवा वर्गात ऊर्जा निर्माण करतात, असे सांगून आयोजकांचे कौतुक केले.

### निवळीत भरवस्तीत घरामध्ये आलेल्या बिबट्याची वनविभागाने केली सुटका

◆ **चिपळूण (प्रतिनिधी) :**

तालुक्यातील निवळी येथे एका घरामध्ये आलेल्या बिबट्याची वनविभागाने सुटका केली. भरवस्तीत बिबट्या आल्याने निवळी पंचक्रोशीत ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

निवळी येथील कातळवाडी येथे दि. ३१ जानेवारी रोजी पहाटे ४.१० वाजण्याच्या सुमारास जयराम रा. मोरे यांचे घराच्या मागील बाजूस असलेल्या पडवीमध्ये बिबट्या आल्याची माहिती पोलीस पाटील निवळी यांनी भ्रमणध्वनीद्वारे वनपाल सावर्डे यांना दिली. यानुसार वनविभागाचे वन्यप्राणी बचाव पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. बचाव पथकामधील



अधिकारी व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी केली असता हा बिबट्या कोंबड्यांच्या वासाने राहत्या घराचे मागील बाजूस असलेल्या पडवीमध्ये बसला असल्याचे दिसून आले. या खोलीच्या दारावरती अर्ध्याभागावर लाकडी फळ्या व पत्र्याने बंद करुन दारासमोर पिंजरा लावून बिबट्या सुखरूप जेरबंद करण्यात यश आले. त्यानंतर बिबट्याला पिंजऱ्यामध्ये सुरक्षीतरीत्या ताब्यात घेतल्यानंतर पशुवैद्यकीय अधिकारी यांनी पाहणी केली असता हा बिबट्या साधारणपणे २.५ ते ३ वर्षाचा असून ती मादी असून तिला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्याकरिता सुस्थितीत असल्याची खात्री झाल्याने वनविभागाच्या बचाव पथकाने या बिबट्यास नैसर्गिक अधिवासात मुक्त केले.


**पालघर नगरपरिषद, पालघर**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**ई-निविदा सूचना (प्रथम)**

मुख्याधिकारी पालघर नगरपरिषद, पालघर खालील कामासाठी शासनाकडील आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून/सेवा पुरवठादाराकडून ऑनलाईन पध्दतीने शासनाच्या **www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर अ.क्र.०१ या विकास कमांकरिता दि.०१/०२/२०२४ ते दि.१५/०२/२०२४ रोजी सांय ४.०० वाजेपर्यंत विना मुल्य डाऊनलोड करता येतील. सदरची ई- निविदा दि.१५/०२/२०२४ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. वैध ई-निविदा दि. १६/०२/२०२४ वाजता पासून उघडण्यात येतील.
पालघर नगरपरिषद कार्यालयात निविदापूर्व बैठक दि. ०६/०२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता ठेवण्यात आली आहे

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | पालघर पुर्व येथील जे.पी.उद्योगनगर येथील मुख्य रस्ता व गटार तयार करणे (सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना) | रु.३,१६,४७,१८२/- | वर्ग ३ व त्यावरील | १२ महिने पावसाळा वगळून |

जा. क्र. पानप/साबां./कार्या-५७८/२०२३-२४
दि.३१/०१/२०२४

सही/- श्री. विपुल कोरपड, नगर अभियंता
सही/- श्री. वैभव आवारे, मुख्याधिकारी पा.न.प
सही/- श्री. उत्तम मो. घरत, उपनगराध्यक्ष
सही/- डॉ. सौ. उज्ज्वला के. काळे, नगराध्यक्षा
शिक्का

**पालघर नगरपरिषद, पालघर**


### खवले मांजर तस्करीप्रकरणी आणखी दोघांना अटक

◆ **खेड (प्रतिनिधी) :**



मुंबई-गोवा महामार्गावरील भरणे, काळकाई देवी मंदिरनजीक जप्त करण्यात आलेल्या खवले मांजराच्या खवले तस्करीप्रकरणी अजून दोन संशयित आरोपींना अटक करण्यात वनविभागाच्या पथकाला यश आले आहे. या तस्करी प्रकरणात आता तीन संशयित आरोपींचा सहभाग स्पष्ट झाला आहे.

अनिल धोंडीराम जाधव (रा. नागाव ता. महाड जि. रायगड) व राजेंद्र रघुनाथ मोरे (रा. दिवील ता. पोलादपूर जि. रायगड) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत.

मंगळवारी दीपक पो. खाडे, विभागीय वन अधिकारी रत्नागिरी (चिपळूण) यांना खवले मांजराचे तस्करी प्रकरणी मिळालेल्या गुप्त बातमीवरून वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी सापळा रचला असता मुंबई-गोवा हायवे भरणे, ता.खेड येथील काळकाई देवी मंदिर येथे दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास एक व्यक्ती संशयितरीत्या फिरताना दिसला होता. चौकशीकरीता ताब्यात घेतले असता त्याच्याजवळील निळ्या रंगाच्या फास्टट्रॅक बॅगेमध्ये नायलॉन बॅगेत खवले मांजराची १.६०० कि. ग्रॅम खवले आढळून आली होती.

या संशयित आरोपीने त्यांचे नाव आतिष अशोक सोनावणे (वय ४२, धंदा शेती रा. तुळशी बुद्रुक बौद्धवाडी, ता. खेड, जि. रत्नागिरी) असे सांगितले. जाधव व मोरे यांची अधिक चौकशी केली असता त्यांनी त्यांचा गुन्हा कबुल केला आहे. या प्रकरणातील तिन्ही आरोपीं विरुद्ध पी. एन. डोईफोडे, वनरक्षक यांनी गुन्हा नोंद केला असून, तिन्ही आरोपींना अटक करून न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ खेड ता. खेडे यांचे कोर्टात हजर करण्यात आले आहे. या आरोपींना न्यायालयाने २ दिवसांची वन कोठडी पुढील तपासाकरीता दिली आहे. याप्रकरणी पुढील तपास पी. जी. पाटील, परिक्षेत्र वन अधिकारी दापोली व त्यांचे अधिनिस्त कर्मचारी करीत आहेत.

### आश्वासन पूर्तता न केल्यास राजेश गमरेंचे उपोषण

**मंडणगड :** प्रजासत्ताक दिनी मंडणगड येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरच्या मागणीसाठी उपोषणास बसलेले सामाजिक कार्यकर्ते राजेश गमरे यांचे उपोषण मागे घेण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक रत्नागिरी यांनी डॉक्टर उपलब्ध करण्याबाबत दूरध्वनीवरून संदेश दिला होता, तर वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय मंडणगड यांनी लेखी पत्र दिले होते. या आश्वासनांची पूर्तता संबंधीत खात्याने न केल्याने राजेश गमरे १ फेब्रुवारी २०२४ रोजी मंडणगड तहसील कार्यालयासमोर पुन्हा एकदा उपोषणास बसणार आहेत.

राजेश गमरे यांनी या विषया संदर्भात आपल्या सहकाऱ्यांसमवेत तहसीलदार तानाजी शेजाळ यांची भेट घेऊन त्यांच्याकडे फेर उपोषणाचे निवेदन सादर केले. रुग्णालयासाठी एम.बी.बी.एस. डॉक्टर उपलब्ध करुन देण्याचे लेखी आश्वासन आरोग्य विभागाकडून देण्यात आले होते; परंतु आरोग्य विभागाने दिलेल्या लेखी आश्वासनाची पूर्तता अद्याप करण्यात आली नसल्याने आम्ही १ फेब्रुवारी २०२४ पासून मंडणगड तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचे निवेदनात स्पष्ट केले आहे. निवेदनाची प्रत जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यासह सर्व संबंधीत यंत्रणांना देण्यात आली आहे.

### कार खरेदीसाठी रोख रक्कमही घेतली, लोनही घेतले; गाडीचा ताबा अद्याप न दिल्याने गुन्हा दाखल

◆ **खेड (प्रतिनिधी) :**

कार खरेदीसाठी रोख रक्कम देऊन लोन करूनदेखील गाडीचा ताबा अद्याप न देता फसवणूक करणाऱ्या एकावर येथील पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार २३ सप्टेंबर २०२३ ते ३० जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये लवेल खेड येथे घडला. हुसेन मोहम्मद हनिफ परकार, रा.खेड, जि. रत्नागिरी असे त्या गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सुनील जनार्दन देशमाने, वय ५३, रा. सात्वीनगाव माळवाडी, ता. खेड यांनी येथील पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादी यांना मौजे लवेल व खेड या ठिकाणी हुंडाई कंपनीची क्रेटा गाडीचा व्यवहार ठरवून देण्यात आला. एकूण रुपये ०८,५०,०००/- रुपये रक्कमपैकी ०१,७०,००० रुपये रोख रक्कम व ०६,८०,००० रुपये लोन करून गाडी विकत देण्यात आली; परंतु या गाडीचा ताबा न देता कौटुंबिक कारणासाठी चार दिवस वापरतो गाडी लागणार आहे, असे सांगितले. मात्र गाडी अद्याप परत मिळालेली नाही. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यांना गाडीचा ताबा द्यावा अशी विनंती केली; परंतु त्यांनी दोन दिवसांनी देतो, असे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने गाडीचा ताबा देण्याची मागणी केली असता अद्याप गाडी परत दिली नाही. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक**
UJJIVAN SMALL FINANCE BANK

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटसअँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना
उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदाच्या कलम १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसा आहे तसाच आहे" आणि "जसा आहे तसाच आहे" या दिवशी केला जाईल.

| अ. क्र. | कर्जखाते क्रमांक / शाखा | कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / तारणदार यांचे नाव | १३(२) सूचनेची तारीख येणे असलेली रक्कम (रुपयांत) संबंधीत तारखेला | ताबा घेतल्याची तारीख | मालमत्तेची पाहणी करण्याची तारीख आणि वेळ | राखीव किंमत रुपयांत / ईएमडी रुपयांत | बोली आणि ईएमडी सादर करण्याची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४४१२२१८८ ६००००००९ आणि ४४१२२१०१ ८००००११ / ४४१२ – ठाणे | **१) आशा बळीराम कारळे. २) रोहित नरेंद्र पोतदार**, दोघेही राहणारः सदनिका क्र. ३०६, ३ रा मजला, श्री गुरु माउली अपार्टमेंट, रेनबो स्कूल शेजारी, हेटकर आळी, नेरळ, रायगड ४१०१०१ **येथे देखीलः** दुकान क्र. ६, गणेश प्लाझा, लोवर ग्राउंड फ्लोर, सर्वे क्र. ३३०/२/ए, सीटीएस क्र. १७५, गाव नेरळ तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०१०१ १) **येथे देखील** : आशा लेडीज पार्लर अँड ॲकॅडमी, घर क्र. ९७, बेकरे, पोस्ट माझगाव, वारेडी, नेरळ, रायगड ४१०१०१ २) **येथे देखील** : ए/ ६ शीतल सीएचएस पाटील पाडा फिश मार्केट जवळ, बदलापूर ठाणे ४२१५०३ | ०४.०७.२०२२ / २६.०५.२०२२ अनुसार रु. २०,९८,५३९.३८/- | ३०.१०.२०२३ | १३ फेब्रुवारी २०२४ आणि २३ फेब्रुवारी २०२४ रोजी स. ११ वा. पासून सायं. ०४. वा. पर्यंत रु. | रु. १७,६७,०००/- / रु. १,७६,७००/- | ०५.०३.२०२४ रोजी स. ११ वा ते सायं. ०५ वा. पर्यंत | ०६.०३.२०२४ आणि स.११.०० वा. ते दु. २.०० वा. |

**स्थावर मालमत्तेचे वर्णनः दुकान क्र. ६, दुकान क्र. ६, गणेश प्लाझा, लोवर ग्राउंड फ्लोर, मोजमापित क्षेत्र ३०६ चौ फूट. बिल्टअप येथे क्र. ३३०/२/ए, सीटीएस क्र. १७५, गाव नेरळ तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०१०१ चा सर्व खंड आणि भूखंड.**

**इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआरमध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे अदा केले जावे), बोली सादर करण्याचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट, हॉटेल झायका पुढे, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१ संपर्क व्यक्तीः नितीन गमरे-८०७०१०७८९०**

**आनंद शॉ – ९८२०५२६०४६, शिवाजी खाडे-७०५८०८०९१५.**

**अटी आणि शर्ती :** इ लिलाव 'जसे आहे जिथे आहे' आणि 'जे आहे, ते आहे' तत्वावर घेण्यात येणार आहे.

१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. इ लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त इ लिलाव सेवा पुरवठादार मेसर्स सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून संपर्क व्यक्ती : विनोद चौहान (मो क्र ९८१३८८७९३१) यांच्याकडून घेण्यात येणार आहे. इच्छूक बोलीदार याना सल्ला देण्यात येतो की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions येथे भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com येथे भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छूक खरेदीदार यांना इ लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९१९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. ही सूचना महत्वाच्या मुद्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदार यांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत. अशा घटना टाळण्यासाठी बोलीदार यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे जे लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेऊ शकतील.

ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

**स्थळ : मुंबई , दिनांक : ३१.०१.२०२४** — **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक**


### ठाकरे गटाचे माजी आमदार सूर्यकांत दळवी यांचा भाजपात प्रवेश

**दापोली :** उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे कोकण दौऱ्यावर येत असतानाच ठाकरे गटाला दापोलीत धक्का बसणार आहे. महिनाभरापूर्वी आदित्य ठाकरे यांच्या कोकण दौऱ्यात निमंत्रण न देता रत्नागिरी जिल्ह्यातील ठाकरे गटात असलेल्या माजी आमदाराला डावलल्याने नाराज झालेल्या दापोलीचे माजी आमदार सूर्यकांत दळवी यांचा आता भाजपा प्रवेश निश्चित झाला आहे.

१ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, यांच्या उपस्थितीत मुंबईत हा पक्षप्रवेश होणार आहे. शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटात नाराज असल्याने त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

मात्र दळवींबरोबर आणखी कोण कोण भाजप प्रवेश करणार? हे मात्र अद्याप समजू शकलेले नाही. सूर्यकांत दळवी यांच्या पक्षप्रवेशाला भाजपातील स्थानिक नेत्यांनी दुजोरा दिला आहे. गुरुवारी दुपारी १ वाजता हा पक्षप्रवेश सोहळा होणार आहे.


**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

मुख्य अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांचे द्वारे खालील कामाकरिता पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टल वर ई-निविदा पद्धतीच्या माध्यमाने सिंगल बोली सिस्टीम मध्ये खुली निविदा मागविण्यात येत आहे. **कामाचे नावः कर्नाटक राज्यातील वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, कारवारमध्ये सहाय्यक अभियंता, मडगांव यांचे क्षेत्राधिकार अंतर्गत हारवाडा-होन्नावर सेक्शनच्या कि.मी. 515/000 ते 568/000 दरम्यान 2 किलोमीटर करिता प्वाइंट आणि क्रॉसिंग आणि टनल-1 मध्ये सम्पूर्ण ट्रॅक नूतनीकरण (पी) कार्य. निविदा सूचना क्र.: केआर/डब्ल्यू/1/58/2023/10, अंदाजित खर्चः रु. 1,35,33,225/-** जीएसटी वगळून. **निविदा बंद होण्याची तारीख/वेळ : 21.02.2024** रोजी **15.00 वा.** पर्यंत, ऑनलाइन प्रस्ताव/बोली जमा करण्यासाठी. **काम पूर्णत्वाचा कालावधीः 240 दिवस** मानसून सह. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही. अधिक तपशील/सहभागी होण्याबाबत माहितीसाठी कृपया संकेतस्थळ **https://ireps.gov.in** पहा. शुद्धीपत्रक/परिशिष्ट फक्त सदर संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.



**उत्तर मध्य रेल्वे**

**निविदा सूचना क्र. १३१२०२३२०२४** — **दिनांक : २४.०१.२०२४**

**ई-निविदा सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक/ अभियंता/ उत्तर मध्य रेल्वे, प्रयागराज हे भारताच्या मा. राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने खालील निर्धारित कामाकरीता दिनांक **२०.०२.२०२४** रोजी **१३:३०** वा. पर्यंत विहीत प्रपत्रावर ई-निविदा मागवित आहेत. निविदेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **अनु. क्र. : १, निविदा क्र. : ३३४** | **अंदाजित मूल्य (रु) : रु १,७२,५२,४४८.५५** |
| **कामाचे वर्णन** : उप मुख्य प्रकल्प व्यवस्थापक गतिशक्ती प्रयागराज यांच्या अंतर्गत उत्तर मध्य रेल्वेच्या कानपूर - प्रयागराज विभागामध्ये पनकी धाम - जी. एम. सी. दरम्यान चतुर्थ मार्गिके मध्ये पी वे सामग्रीचे लोडिंग - अनलोडिंग आणि रचून ठेवण्याचे काम आणि पी. आर. सी. स्लिपर्सवर बीजी ट्रॅकला जोडण्यात ट्रॅक दगडी खडीची पुर्तता करणे आणि पसरवण्याचे कार्य तसेच टर्न आउट ट्रॅप, बीजी ट्रॅक आदी काढून टाकणे आणि जोडण्याच्या पुर्तते संबंधित ट्रॅकचे काम. | |
| **इसारा रक्कम (रु)** : रु २,३६,३००.०० | **पुर्ण होण्याचा कालावधी** : ०४ महिने. |

**निविदा उघडण्याची तारीख** : २०.०२.२०२४, **पात्रता अर्हतेच्या अंतर्गत तत्सम काम** : पी. वे. काम, **टिप** : १. ऑन लाईन निविदा दिनांक **२०.०२.२०२४** रोजी **१३:३०** वा. पर्यंत सादर करता येतील. २. उपरोक्त ई-निविदेचे संपूर्ण विवरण (निविदा प्रपत्रा सहीत) संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर निविदा उघडण्याच्या नियत तारीखे रोजी दि. **२०.०२.२०२४** रोजी **१३:३०** वा. पर्यंत उपलब्ध आहे.
152/24 (ADM)

North central railways | @CPRONCR | @northcentralrailway | www.ncr.indianrailways.gov.in



**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ** (म्हाडाचा घटक)
म्हाडा MHADA

**निविदा सूचना**

**कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी.एम.सी. फ दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई - ४०००१२. यांचेकडे म्हाडा/ सिडको/पी.डब्ल्यू.डी/सी.पी.डब्ल्यू.डी/एम.आय.डी.सी./बी.पी.टी./एम.ई.एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी-१ फॉर्ममध्ये [टक्केवारी दर] सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे.**

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | १% इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम (विना परतावा रु.१८% GST सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | उपकरप्राप्त इमारत क्र. महादेव इमारत, महादेव पालव मार्ग रोड मुंबई-१२ फ दक्षिण विभागा अंतर्गत [आमदार निधीचे काम] | ३,४५,८२२/- | ३४५९.०० | ७,०००/- | ५९०.०० | दि. ०१.०२.२०२४ ते दि. १२.०२.२०२४ सकाळी ११:०० ते दुपारी १.०० | दि. १३.०२.२०२४ ते दि. १४.०२.२०२४ सकाळी ११:०० ते दुपारी १.०० | १० महिने | वर्ग ८ व त्यावरील |
| २. | उपकरप्राप्त इमारत क्र. १८५, पटेल टेरेस जेरबाई वाडिया रोड मुंबई-१२, फ दक्षिण विभागा अंतर्गत [आमदार निधीचे काम] | ६,०६,६०९/- | ६०६७.०० | १३,०००/- | ५९०.०० | दि. ०१.०२.२०२४ ते दि. १२.०२.२०२४ सकाळी ११:०० ते दुपारी १.०० | दि. १३.०२.२०२४ ते दि. १४.०२.२०२४ सकाळी ११:०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ३. | उपकरप्राप्त इमारत क्र. ११-१२ पेरू चाळ लालबाग मुंबई-१२, फ दक्षिण विभागा अंतर्गत [आमदार निधीचे काम] | ३,४६,०४६/- | ३४६१.०० | ७,०००/- | ५९०.०० | दि. ०१.०२.२०२४ ते दि. १२.०२.२०२४ सकाळी ११:०० ते दुपारी १.०० | दि. १३.०२.२०२४ ते दि. १४.०२.२०२४ सकाळी ११:०० ते दुपारी १.०० | १० महिने | वर्ग ८ व त्यावरील |

1. जर निविदेचा देकार कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्यूनतम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम १५ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2. कोऱ्या निविदा म्हाडा /मुं.म.पा./सा.बां विभाग/ कें. सा.बां.वि/रेल्वे /बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
3. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
5. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ.दु. व पु मंडळ यांच्या नावावर दयावी.
6. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ[द] विभाग, फ[द] विभाग तिसरा मजला ए ॲनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई-१२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो **दि. १४/०२/२०२४** रोजी दुपारी ३.०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ [द] विभाग मुं.इ.दु. व पु. मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
8. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामचा/ वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर ] आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
9. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने/ साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
10. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे.
11. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी.एस.टी. ची अदागयी स्विकृत करारनामा मूल्यावर होईल
12. जी.एस.टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता फ (द ) विभाग
मुं. इ. दु. व पु. मंडळ,

CPRO/A/120
**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**